राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र.२४/का-५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई:-४०० ०३२.
दिनांक:- १७ डिसेंबर, २०२५.
ई-मेल - sec.corp@mah.gov.in

संदर्भ :- १. राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि. १३ ऑगस्ट, २०१८ चे आदेश.
२. राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि. २६ सप्टेंबर, २०२३ चे आदेश.
३. राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि. १२ डिसेंबर, २०२५ चे आदेश.

## आदेश

राज्य निवडणूक आयोगाच्या दि. २६ सप्टेंबर, २०२३ च्या आदेशान्वये अनधिकृत बांधकाम केल्याचे सिध्द झाल्यास उमेदवार अनर्ह ठरु शकतो. याअनुषंगाने दि. १३ ऑगस्ट, २०१८ च्या आदेशासोबतच्या शपथपत्रातील मुद्दा क्र. १६.५ मध्ये सुधारणा केली आहे. सदर सुधारणा अंतर्भूत करण्याकरीता राज्य निवडणूक आयोगाने दि. १२ डिसेंबर, २०२५ काढलेल्या आदेशातील खालील मुद्दा क्र.४

"यथास्थिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १०/मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६ मधील तरतुदींचे मी वाचन केले असून त्यानुसार मी महानगरपालिका सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी अपात्र नाही."

### ऐवजी खालीलप्रमाणे वाचावे-

"यथास्थिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १०/मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६ मधील तरतुदींचे मी वाचन केले असून त्यानुसार मी महानगरपालिका सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी अपात्र नाही. मी स्वत: अथवा माझी पत्नी/माझे पती/माझे अवलंबित यांनी कोणतेही अनधिकृत बांधकाम केलेले नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १०(१ड)/मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६ (१ड) मधील तरतुदीनुसार जर मी निवडून आल्यावर

अनधिकृत बांधकाम केले असल्याचे सिध्द झाल्यास मी नगरसेवक पदावर राहण्यास अनर्ह ठरेन, याची मला जाणीव आहे."

त्यामुळे दि. १२ डिसेंबर, २०२५ च्या आदेशासोबत जोडलेल्या शपथपत्रातील मुद्दा क्र. १६.५ सुधारीत करुन शेवटचे पृष्ठ सोबत जोडल्यानुसार राहील. त्यानुसारच उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत जोडावयाचे शपथपत्राचे नमुने सुधारीत करुन उमेदवारांना उपलब्ध करुन द्यावेत.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

१८.१२.२०२५

(सुरेश काकाणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत -
१. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग (नवि-२), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
२. सर्व महानगरपालिका आयुक्त
३. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयातील राज्य निवडणूक आयोगाचे वकील
४. संगणककीकरण शाखा- संगणक प्रणालीमधील नमुन्यात योग्य त्या दुरूस्त्या करण्याकरीता.
५. निवड नस्ती

(ब) मतदारसंघ विकास योजना

| अ.क्र. | प्रश्न उत्तर |
|---|---|
| १ | जर मी निवडून आल्यास स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्राच्या विकासासाठी मी खालीलप्रमाणे उपाययोजना करीन. (कमीत कमी १०० शब्द वजास्तीत जास्त ५०० शब्द) |

**१६. मी शपथेवर सांगतो/सांगते की, -**

१. वरील मजकूर माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे सत्य व अचूक आहे. यातील कोणताही भाग खोटा नसून त्यामध्ये कोणतीही महत्वाची वस्तुस्थिती लपविण्यात आलेली नाही,

२. दिनांक १२ सप्टेंबर २००१ नंतर माझ्या एकूण मुलांच्या संख्येत भर पडून ती दोनपेक्षा जास्त झाल्यास मी उपरोक्त स्थानिक स्वराज्य संस्थेचा सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

३(अ). निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास माझी निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द होईल आणि मी त्या स्थानिक स्वराज्य संस्थेचा सदस्य राहण्यास अनर्ह/अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

३(ब). निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत जात पडताळणी समितीने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर करीन अशी हमी देत आहे.

४. निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या कालावधीमध्ये निवडणूक खर्चाचा हिशोब विहित पद्धतीने सादर न केल्यास मी त्या स्थानिक स्वराज्य संस्थेचा सदस्य राहण्यास अनर्ह/अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे

५. यथास्थिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १०/मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६ मधील तरतुदींचे मी वाचन केले असून त्यानुसार मी महानगरपालिका सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी अपात्र नाही. मी स्वत: अथवा माझी पत्नी/माझे पती/माझे अवलंबित यांनी कोणतेही अनधिकृत बांधकाम केलेले नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १०(१ड)/मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६(१ड) मधील तरतुदीनुसार जर मी निवडून आल्यावर अनधिकृत बांधकाम केले असल्याचे सिध्द झाल्यास मी नगरसेवक पदावर राहण्यास अनर्ह ठरेन, याची मला जाणीव आहे.

६. सदर निवडणूक, मी मुक्त; निर्भय व पारदर्शकरित्या लढविन तसेच सदर निवडणुकीमध्ये, मी किंवा माझ्यावतीने कोणीही व्यक्ती, कोणत्याही प्रकारच्या भ्रष्ट मार्गाचा अवलंब करणार नाही आणि जर मी किंवा माझ्यावतीने कोणीही भ्रष्ट मार्गाचा अवलंब केला असल्याचे आढळून आल्यास मी कारवाईस पात्र राहीन.

स्थळ:-

दिनांक:- (उमेदवाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा)

पडताळणी

मी वर नमूद केलेला अभिसाक्षी, तपासणी करून घोषित करतो की, या शपथपत्रातील मजकूर माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे सत्य व अचूक आहे. यातला कोणताही भाग खोटा नसून, त्यापासून कोणतीही महत्त्वाची वस्तुस्थिती लपविण्यात आलेली नाही.

-----येथे दिनांक-----माहे-----२०-- रोजी तपासले.

स्थळ:- **अभिसाक्षी,**

दिनांक :- **माझ्यापुढे तपासले,**

**(तपासणी प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी व पदनाम शिक्का).**